प्रकरण १ ले

# दलित रंगभूमी संकल्पना व स्वरूप

## प्रकरण पहिले

# दलित रंगभूमी संकल्पना आणि स्वरूप

**प्रस्ताविक :**

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी वाङ्मयामध्ये जे ग्रामीण, स्त्रीवादी, जनवादी, विज्ञानवादी साहित्यप्रवाह उदयास आले त्यामध्ये दलित साहित्य या वाङ्मय प्रवाहाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतीय समाजव्यवस्थेतील अस्पृश्य, भटका, गुन्हेगार, आदिवासी समाज या वाङ्मयाच्या माध्यमातून आपल्या वाट्याला आलेले उपेक्षित जीवन, अवहेलना, जुलूम, जबरदस्ती, अन्याय, अत्याचाराशी निगडीत जीवन जाणिवा दलित साहित्याच्या माध्यमातून मांडू लागला.

दलित साहित्यामध्ये दलित रंगभूमी या प्रवाहाचा अभ्यास करीत असताना आपणाला असे दिसते की, दलित नाटकामध्ये नाटककारांनी अनेकानेक विषय घेऊन नाटके लिहिली आहेत. त्यामध्ये अंधश्रद्धेवर, अस्पृश्यतेवर दलितांवरील अन्याय, आंतरजातीय विवाह, दलित मुक्तीची कहाणी, दलितांच्या व्यथावेदना प्रकट करणारे विषय, धर्मांतर, बौद्ध धम्माचे वैशिष्ट्य सांगणारे विषय तसेच गांधीजी, आंबेडकर यांच्यातील संघर्ष असे अनेकानेक विषय घेऊन दलित नाटकामध्ये समस्याप्रधान विषय मांडले आहेत. दलित रंगभूमीवर म. मि. चिटणीस यांचे ‘युगयात्रा’, नामदेव व्हटकर यांचे ‘डाग’, ‘वाट चुकली’, मा. आ. कारंडे गुरूजी ‘संगीत जयबौद्ध’, ‘काळोखाच्या गर्भात’, भि. शि. शिंदे, प्रकाश त्रिभुवन ‘थांबा रामराज्य येतंय!’ इत्यादी नाटके रंगभूमीवर प्रारंभीच्या काळात लोकप्रिय झाली. त्यानंतर दत्ता भगत, रामनाथ चव्हाण, प्रेमानंद गज्वी यांच्या नाट्याने दलित नाटक अधिक सशक्त झाले. विशेषत: गज्वी यांच्या नाटकांना दलित नाटकांच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यांच्या ‘गांधी-आंबेडकर’ या नाटकाने चिंतनीय अशा नाटकाचा पाया घातला. गांधीजी आणि आंबेडकर हे दोघेही महापुरूष आहेत. त्यांनी केलेले कार्य असाधारण आहे. दोघांमध्ये वैचारिक संघर्ष होता,

त्यांच्या कार्यपाठीमागील तात्त्विक भूमिका वेगवेगळ्या होत्या. भालचंद्र फडके यांनी 'डॉ. आंबेडकर आणि गांधीजी' या नावाचे त्यांच्यातील संघर्षात्मक नाटक लिहले आहे. गज्वी आणि फडके यांनी लिहलेली दोन्हीही नाटके इतिहासाला धरून आहेत. भालचंद्र फडके यांच्या नाटकामध्ये आणि प्रेमानंद गज्वी यांच्या नाटकामध्ये दोघांनीही गांधीजी-आंबेडकर यांच्यातील संघर्ष मांडला आहे. त्यातील त्यांची भाषा त्या नाटकातील आशय, विषय आणि संघर्ष कसा मांडला आहे हे दोघेही महापुरूष समोरासमोर कसे उभे केले आहेत. या ऐतिहासिक विषयामागील त्यांची काय भूमिका असावी असा सर्वांगाने नाटकाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या प्रबंधामध्ये केला आहे म्हणून "गांधी-आंबेडकर या विषयावरील दलित नाटक : एक अभ्यास" हा विषय वरील दोन नाटकाच्या अनुषंगाने संशोधनासाठी घेतला आहे.

दलित नाटक हे आंबेडकरी चळवळीतून निर्माण झाले आहे, त्यामुळे दलित नाटक हे चळवळीच्या अंगाने जाते. दलित नाटके ही प्रबोधनात्मक आणि समस्याप्रधान दिसून येतात. त्यामध्ये आपणाला दलितांचे वास्तव चित्रण आपणाला पहायला मिळते. पण आंबेडकरी चळवळीमुळे आणि त्यांच्या समाज जागृतीमुळे दलित समाज शिकला आणि आपले वास्तव जीवन विदारक अनुभव तो साहित्याच्या माध्यमातून मांडू लागला. काव्य, कथा, कादंबरी, आत्मकथन, नाटक यापैकी आपणाला नाटक या साहित्यप्रकारांचा अभ्यास येथे करावयाचा आहे. त्यासाठी त्याची संकल्पना आणि स्वरूप पाहणे गरजेचे आहे. त्यामुळे मान्यवर अभ्यासकांच्या भूमिकेद्वारे सदर संकल्पनेची मांडणी पुढे केली आहे.

दलित रंगभूमी प्रस्तापित रंगभूमीपेक्षा वेगवेगळ्या जीवन जाणिवा अभिव्यक्त करणारी आहे. नाट्यसंहितेचा आशय व्यक्तिरेखा संघर्ष यांचे स्वरूप प्रस्तापित रंगभूमीपेक्षा वेगळे आहे. एवढेच नाहीतर दलित नाटकाच्या सादरीकरणामध्ये लोकाविष्काराला अनन्य सादरीकरणाला महत्त्व दिले आहे.

संहिता आणि प्रयोगाच्या पातळीवर दलित नाटक वेगळे ठरते. अशा या दलित नाटकाचे वेगळेपण सिद्ध करण्याचा प्रयत्न पुढील अभ्यासकांनी केलेला आहे. भालचंद्र

फडके यांच्या नाटकामध्ये आणि प्रेमानंद गज्वी यांच्या नाटकामध्ये दोघांनीही गांधीजी-आंबेडकर संघर्ष मांडला आहे. हे दोघेही महापुरूष समोरासमोर कसे उभे केले आहेत. या ऐतिहासिक विषयामागील त्यांची काय भूमिका असावी असा सर्वांगाने नाटकाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या प्रबंधामध्ये केला आहे. म्हणून ''गांधी - आंबेडकर विषयावरील दलित नाटक : एक अभ्यास''हा विषय वरील दोन नाटकाच्या अनुषंगाने संशोधनासाठी घेतला आहे.

दलित नाटक हे आंबेडकरी चळवळीतून निर्माण झाले आहे. त्यामुळे दलित नाटक हे चळवळीच्या अंगाने जाते. दलित नाटके ही प्रबोधनात्मक आणि समस्याप्रधान आहेत. त्यामध्ये आपणाला दलितांचे वास्तव चित्रण पहायला मिळते. पण आंबेडकरी चळवळीमुळे आणि त्यांच्या समाज जागृतीमुळे दलित समाज शिकला आणि आपले वास्तव जीवन विदारक अनुभव तो साहित्याच्या माध्यमातून मांडू लागला. काव्य, कथा, कादंबरी, आत्मकथन, नाटक यापैकी आपणाला 'नाटक' या साहित्यप्रकाराचा अभ्यास येथे करावयाचा आहे. त्यासाठी त्यांची संकल्पना आणि स्वरूप पाहणे गरजेचे आहे. त्यामुळे मान्यवर अभ्यासकांच्या भूमिकाद्वारे दलित रंगभूमी संकल्पनेची मांडणी पुढे केली आहे.

## दलित रंगभूमीची संकल्पना :

दलित रंगभूमी प्रस्तापित रंगभूमीपेक्षा वेगळी आहे ती वेगवेगळ्या जीवन जाणिवा व्यक्त करणारी आहे. नाट्यसंहितेचा आशय, व्यक्तिरेखा, संघर्ष यांचे स्वरूप प्रस्तापित रंगभूमीपेक्षा वेगळे आहे. एवढेच नाही तर दलित नाटकाच्या सादरीकरणामध्ये लोकाविष्काराला अनन्य सादरीकरणाला महत्त्व दिले आहे.

संहिता आणि प्रयोगाच्या पातळीवरील दलित नाटक वेगळे ठरते. अशा या दलित नाटकाचे वेगळेपण सिद्ध करण्याचा प्रयत्न पुढील अभ्यासकांनी केलेला आहे.

### १) भि. शि. शिंदे :

''दलित या शब्दाचा अर्थ मुळी पिडलेले, नाडलेले, शोषित, वंचित, उपेक्षित असा आहे आणि अशा लोकांचा दडपलेला आवाज रंगभूमीवर काढणारी रंगभूमी ती दलित

रंगभूमी होय."[१] या संकल्पनेला जोडूनच मूळ संकल्पना विस्तृत करताना भि. शि. शिंदे म्हणतात की, "गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या. मगच तो बंड करून उठेल असा बुलंद आवाज उठविणारी, संदेश देणारी जी रंगभूमी ती दलित रंगभूमी होय"[२] शिंदे यांच्या संकल्पनेकडे पाहिले असता असे दिसून येते की, ज्यांना आजपर्यंत कसल्याही प्रकारचे हक्क मिळालेले नाहीत. ज्याचे शोषण झाले आहे हे शोषण सामाजिक, धार्मिक, आर्थिक पातळीवर झालेले असेल अशा उपेक्षित, वंचित, लोकांच्या आपल्या हक्कासाठी रंगभूमीवर काढलेला आवाज म्हणजे दलित रंगभूमी त्याचप्रमाणे गुलामाला आपल्या गुलामीची जाणीव करून देऊन त्याला आपल्या हक्कासाठी संघर्ष करायला भाग पाडणारी जी रंगभूमी ती दलित रंगभूमी असे त्यांना वाटते.

आंबेडकरी विचारधारा जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था नाकारते म्हणून दलित रंगभूमीने जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था नाकारली पाहिजे पण ज्या नाटकातून दलित समाजाचे वास्तव चित्रण केले असेल आणि दलितत्त्व सोडण्याचा विचार जर त्या नाटकात आला असेल किंवा फुले, आंबेडकरी विचारधारा जर त्यातून प्रकट होत असेल तर ती दलित रंगभूमी होय.

## २) प्रा. विजयकुमार गवई :

"सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक पिळवणूकीत बळी ठरलेले असतील अशांना स्वाभिमानाने जगा असा संदेश देणारी शक्ती म्हणजे दलित रंगभूमी"३ अशा दलित नाटकामध्ये आंबेडकरी विचार असणे आवश्यक आहे. तरच ती दलित रंगभूमीची संकल्पना परिपूर्ण होऊ शकेल.

ज्याचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक शोषण झाले असेल पण ज्यांना वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था मान्य असेल तर मग अशा शोषितांचे काय? हा प्रश्न उपस्थित होतो.ज्यांना जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था मान्य असेल तर मग अशांना स्वाभिमानाने जगता येईल का? याचे उत्तर नाही असेच मिळेल. म्हणून दलित संकल्पना मांडताना ज्या नाटकातून दलितांच्या व्यथा, वेदना, दु:ख, नकार, विद्रोह वास्तववादी दृष्टिकोनातून मांडले

जातात त्यास स्थुलमानाने दलित नाटक म्हणता येईल. पण आंबेडकरी विचार त्यातून मांडल्यास त्या नाटकांना खऱ्या अर्थाने दलित नाटक म्हणता येईल.

### ३) प्रा. दत्ता भगत :

"आंबेडकरी विचारधारा आत्मसात केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या जीवनविषयक दृष्टीकोनाच्या आधारे स्वत:ला आणि स्वत:च्या भोवती असणाऱ्या वास्तवाला जाणून घेण्याचा उत्कट इच्छाशक्तीचा शब्दरूप अविष्कार म्हणजे दलित नाटक."[४] या संकल्पनेमध्ये दत्ता भगत यांनी आंबेडकरी विचाराचे अधिष्ठान दिले आहे. कारण दलित नाटकामध्ये आंबेडकरी विचारधारा सादर झाली पाहिजे. म्हणून प्रा. दत्ता भगत यांनी केलेली संकल्पना योग्य आहे असे वाटते.

### ४) प्रा. अविनाश डोळस :

"दलित नाटक प्रामुख्याने आंबेडकरी विचाराने प्रभावित झालेल्या जीवनविषयक आकलनाचा कलाविष्कार आहे."[५] प्रा. डोळस यांचीही संकल्पना प्रा. भगत यांच्याप्रमाणेच आंबेडकरी विचारांना महत्त्व देते आहे. आंबेडकरी विचाराने प्रभावित होऊन जीवनविषयक आकलनाचा कलाविष्कार या नाटकात दिसते ते बरोबर आहे. त्यामुळे त्यांची संकल्पना दलित नाटकाला लागू पडते आहे.

### ५) प्रा. डॉ. तारा भवाळकर :

"आंबेडकरी विचाराच्या जाणिवा ज्या रंगमंचावरून व्यक्त होतात त्या रंगमंचास दलित रंगभूमी म्हणतात."[६] आंबेडकरी विचाराने प्रेरीत होऊन दलितांच्या जीवन जाणिवा दलित रंगमंचावरून येतात. त्याच नाटकास आणि रंगभूमीस दलित रंगभूमी म्हणता येते. असे प्रा. डॉ. तारा भवाळकर यांना वाटते ते बरोबर आहे. त्यामुळे वरील संकल्पना दलित रंगभूमीला लागू पडते आहे.

### ६) प्रा. डॉ. गंगाधर पानतावणे :

"दलित या शब्दाचा अर्थच मुळी पिडलेले, नाडलेले, वंचित, उपेक्षित, बहिष्कृत असा आहे. अशा दडपलेल्या समूहाचा आवाज ज्या जाणिवेने प्रकट होतो ते दलित नाटक

फुले, आंबेडकरांच्या मानवमुक्तीच्या चळवळीची एक सांस्कृतिक शाखा म्हणजे दलित रंगभूमी होय.''[७] ज्या नाटकातून वास्तव जीवन, वास्तव समस्या, वेदना विद्रोहाबरोबर फुले, आंबेडकरांच्या जाणिवा प्रकट झाल्या आहेत अशा नाटकांना फुले आंबेडकरी नाटक असे म्हणता येईल. दलित नाटक या संकल्पनेबरोबरच फुले-आंबेडकरी प्रेरणेचे नाटक ही संकल्पना आज रूढ होताना दिसते.

## ७) प्रा. गौतमीपुत्र कांबळे :

''ज्या नाटकातून फुले-आंबेडकरी विचाराच्या जाणिवा व्यक्त होतात त्या नाटकांना फुले-आंबेडकरी नाटक अशी संज्ञा आज प्राप्त झाली आहे.''[८] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म. फुले यांना आपले गुरू मानले असले तरी त्यांचे विचार त्यांनी जसेच्या तसे मान्य केले नाहीत. तर काही विचारांसह आंबेडकरांनी म. फुले यांना स्वीकारले आहे. त्यामुळे फुले-आंबेडकरी प्रेरणेचे नाटक म्हणण्यापेक्षा आंबेडकरी प्रेरणेचे नाटक ते दलित नाटक असे म्हणल्यास वावगे ठरणार नाही.

## ८) प्रा. भालचंद्र फडके :

''रंगभूमी हीच दलित लेखकांच्या वेदनेला अविष्कृत करू शकेल. रंगभूमीची भाषा विद्रोहाच्या ज्वाला फुलवील आणि हिच भाषा प्रबोधनाचा प्रकाश पसरविल.''[९] म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुता यासाठी करावा लागणारा संघर्ष आणि पारंपरिकेतून निर्माण होणाऱ्या वेदना विद्रोहरूपाने मांडून समाज प्रबोधन करणे हाच दलित रंगभूमीचा हेतू आहे. एकंदरीत दलित लेखकाने आपले लेखन श्रेष्ठ वा कनिष्ठ याची पर्वा न करता आपल्या लिखाणातून स्वत:च्या जाणीवेचा वेध घेऊन लिहले तर त्यांचा त्या ठिकाणचा विद्रोह दिसून येईल. त्यांनी स्वत:चा शोध घेऊन आंबेडकरी प्रेरणेने लिहले पाहिजे व त्या त्या नाटकातून आपली वेदना व विद्रोह प्रकट केला पाहिजे. ते दलित नाटक होऊ शकेल.

## ९) मधुसूदन गायकवाड :

''ही दलित रंगभूमी उदयाच्या सामाजिक लोकशाही असलेल्या नवसमाजाची रंगभूमी आहे.''[१०] दलित नाटकाचा उगम मुळी अन्यायाची जाणीव चीड, प्रचंड दु:ख यातून

येणारा विद्रोह यातून झालेला आहे. पण दलित रंगभूमी उदयाची सामाजिक लोकशाही असलेल्या नवसमाजाची ती एक प्रमुख रंगभूमी आहे पण तिने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रेरीत होऊन आपली वाटचाल चालू ठेवली पाहिजे.

### १०) नरहर कुरुंदकर :

''दलित रंगभूमी ही परिवर्तनाला गती देण्यासाठी म्हणून दलित लेखकांनी निर्माण केली आहे. त्यातून एक नवसमाज निर्माण करण्याच्या हेतूने ही दलित रंगभूमी महत्त्वाची मानावी लागेल.''[११] नवोदित नाट्यलेखकांकडून चांगल्या नाट्यनिर्मितीची अपेक्षा करणे योग्य नसले तरी परिवर्तनाचा सामाजिक विचार तटस्थपणे मांडणे हे ही थोडे नाही. कुरुंदकर यांच्या संकल्पनेतून असे लक्षात येते की परिवर्तनाला गती देण्यासाठी दलित नाट्य हे निर्माण झाले आहे आणि त्यातून नवसमाज निर्माण होण्याच्या दृष्टीने दलित रंगभूमी महत्त्वाची मानावी लागेल. परंतु त्यातून आंबेडकरी विचार, प्रेरणा स्पष्ट झाल्या पाहिजेत तरच ते योग्य वाटेल.

### ११) प्रा. रा. ग. जाधव :

''दलितांची दलितांसाठी दलितांनी चालविलेली नाट्यचळवळ म्हणजे दलित रंगभूमी'' अशी व्याख्या विवेचनाची सोय म्हणून आपण करतो. प्रा. रा. ग. जाधव दलित रंगभूमीविषयी म्हणतात,

''माझ्यासारख्याला एवढेच जाणवते की, प्रतिभावंत नाटककार ही दलित रंगभूमीची आजची निकड आहे. बाकी सर्व कलात्मक साज दलित रंगभूमीकडे आहेच.''[१२] दलित जाणिवांशी समरस झालेले गुणी कलावंत जातिधर्मनिरपेक्षतेने दलित रंगभूमीसाठी काम करताना आढळतात. दलित रंगभूमीच्या नाट्यप्रयोगांना जाणारा प्रेक्षकवर्ग हाही समिश्रच असणे आणि दलित रंगभूमीने आजवर केलेल्या नाट्यप्रयोगांना जाणारा प्रेक्षकवर्ग हा ही संमिश्रच आहे. दलित रंगभूमीने आजवर केलेले नाट्यप्रयोग आशयदृष्ट्या आपल्या एकूणच समाजाला उद्बोधक नाट्यप्रत्यय देणारे आहेत.

## १२) प्रेमानंद गज्वी :

''दलित रंगभूमी वैचारिक बांधिलकी मानणारी व अखिल मानव कल्याणासाठी सिद्ध झालेली व या जगात सर्वोत्तम असे जे मूल्य आहे. ''मानव्य' त्याच्या रक्षणासाठी सिद्ध झालेली आहे.''[१३] दलित रंगभूमी डॉ. आंबेडकरांची वैचारिक बांधिलकी स्वीकारणारी आहे आणि मानवाच्या संरक्षणासाठी सिद्ध झालेली आहे. कुठल्याही दलित लेखकाच नाटक घ्या. त्यातून येणारा संघर्ष हा दलित विरुद्ध सवर्ण असतो व तो स्वाभाविक आहे कारण अन्याय करणारे आणि अन्याय सहन करणारे याचे चित्र समोर ठेवल्याशिवाय मानव्याच्या अंतिम ध्येयाकडे जाता येणार नाही म्हणून डॉ. आंबेडकराच्या वैचारिक बांधिलकीने मानव्याच्या रक्षणासाठी दलित रंगभूमी निर्माण झाली आहे असे वाटते.

## १३) श्री. रामनाथ चव्हाण :

''हिंदू धर्म, जाती आणि वर्ण व्यवस्थेने ज्यांना पिढ्यानपिढ्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक लाभातून दूर ठेवले त्यांचे माणूसपण नाकारलं अशा उपेक्षितांच्या व्यथा वेदनेची ही दलित रंगभूमी आहे.''[१४] नाकारलेले माणूसपण मिळविण्यासाठी विद्रोह करणारी ही रंगभूमी आहे. सामाजिक अन्यायाविरुद्ध संताप व्यक्त करून जातीयवाद्यांना आव्हान देणारी ही रंगभूमी आहे ती धर्मचिकित्सा करते, अन्याय, अत्याचाराचं विदारक वास्तव, नग्न सत्य तुमच्यासमोर मांडते पण यामध्ये डॉ. आंबेडकरी विचार, प्रेरणा, जाणिवा असल्याशिवाय या संकल्पनेला पूर्णत्व येणार नाही.

## १४) प्रा. ग. प्र. प्रधान :

''चळवळ जेव्हा प्रचंड उलाघालीची होते तेव्हा कार्यकर्त्यांची उत्कटता, तीव्रता कलारूपाने अविष्कृत होऊ शकते. जगणे हाच त्यांच्यासाठी संघर्ष आहे. त्यांच्या अनुभवाचा अविष्कार नाटकामधून होणे ही स्वाभाविक गोष्ट आहे. चळवळ व शाश्वतता याबाबत दलित चळवळीतील कार्यकर्त्यांच्या मनातील संघर्ष एखाद्या समर्थ नाटककाराने मांडला पाहिजे.''[१५] दलितांचे जगणे हे त्याच्यासाठी संघर्ष आहे. त्यांचा अनुभव,

अविष्कार नाटकातून दिसणे साहजिकच आहे. तेव्हा दलित चळवळीतील संघर्षाची मांडणी त्यातील कार्यकर्त्यांची उत्कटता, तिव्रता कलारूपाने नाटकात अविष्कृत होऊ शकते.

### १५) प्रा. भगवान ठाकूर :

''दलितांनी दलितांसाठी दलितांचे दलितत्त्व दूर व्हावे म्हणून केलेला नाट्यधर्मी अविष्कार म्हणजे दलित रंगभूमी.''[१६] ही संकल्पना बरीचशी मान्य होण्यासारखी आहे परंतु डॉ. आंबेडकरांच्या विचाराची कास धरून चालले पाहिजे. समग्र मानव मुक्तीच्या लढ्याच्या ध्येयासाठी दलित रंगभूमी ही संकल्पना निर्माण झाल्याचे दृष्टोत्पत्तीस येते.

### १६) डॉ. मधुकर मोकाशी :

''दलित नाटक हे प्रामुख्याने आंबेडकरी विचारांनी प्रभावित झालेले असून ते एक आंबेडकरी जीवनविषयक आकलनाचा कलाविष्कार आहे. त्याचबरोबर भगवान बुद्ध यांनी सांगीतलेली मानवाबद्दलची अतीव करुणा या संदर्भात महत्त्वाची आहे.''[१७] दलित नाट्यचळवळ ही एक दलित समूहाची दलित जाणिवेची दलित सुखदु:खाची एक सांस्कृतिक चळवळ आहे. तीच त्या नाटकाच्या अस्तित्वाची व भवितव्याची, अभिव्यक्तीची सुधारणावादी चळवळीचे प्रतीक आहे असे वाटते.

### १७) रामदास कांबळे :

''दलित रंगभूमी हे नामाभिधान धारण करतानाच बऱ्याच गोष्टी स्पष्ट होतात त्या म्हणजे विद्रोह आणि नकार यांनी युक्त अशी दलित संवेदनेची अभिव्यक्त करणारी, जीवमूल्याचे चित्रण करणारी रंगभूमी म्हणजे दलित रंगभूमी होय.''[१८] उपरोक्त विद्वानांची मते लक्षात घेता ही व्याख्या योग्य वाटते. नकार विद्रोह आणि तत्वत्रयींनी युक्त असलेल्या आजच्या दलित रंगभूमीचे स्वरूप पूर्णपणे डॉ. आंबेडकरांच्या विचारसरणीतून साकार झाले आहे. म्हणून काही शब्दात आपणाला म्हणता येईल की, ''दलित रंगभूमी जीवननिष्ठ आहे.''

### १८) डॉ. कृष्णा किरवले :

"दलित नाटक हे पारंपरिक जीवनसखीला नाकारून काळसंदर्भात नवीन जीवनमुल्यांचा स्वीकार करून पारंपरिक मराठी रंगभूमीला आव्हान देण्यासाठी ठामपणे उभे राहण्याचा प्रयत्न करीत आहे. दलित नाटक हे देखील चळवळीचा एक भाग आहे."[१९] पारंपरिक जीवनसखीला नाकारून डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेने नवीन जीवनमूल्यांचा स्वीकार करून विद्रोहाने पेटून उठलेल्या दलित रंगभूमीने मराठी रंगभूमीच्या दालनात पाय ठेवून मराठी रंगभूमीला आशय देण्याचा प्रयत्न केला आहे.

### १९) आयु. टेक्सास गायकवाड :

२० मार्च १९९१ पासून दलित रंगभूमी विसर्जन करून 'प्रबुद्ध रंगभूमीची' स्थापना करण्यात आली आहे.

"प्रबुद्ध रंगभूमीचे आदर्श ठरणारे गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रवाहाच्या विरुद्ध जाऊन क्रांती केली. त्याचप्रमाणे प्रवाहाच्या विरुद्ध जाऊन प्रबुद्ध रंगभूमीला देखील क्रांती करावयाची आहे. भरतमुनींनी तथाकथीत जो मानवतेला काळीमा फासणारा प्रवाह निर्माण केलाय त्या प्रवाहाविरुद्ध प्रबुद्ध रंगभूमीला लढा द्यावयाचा असून समतेचा, मैत्रीचा, करुणेचा स्वातंत्र्याचा मारा भरतमुनीकृत रोगट प्रवाहावर फवारा मारून हा प्रवाह शुद्ध करायचाय ! भरतमुनींच्या नाट्यशास्त्राने दुषित झालेला प्रवाह प्रबुद्ध रंगभूमीच्या रुपाने पुनश्च वैभवशाली करण्याची प्रतिज्ञा प्रबुद्ध रंगभूमीची आहे."[२०]

### वरील मान्यवरांच्या अभ्यासातून हाती आलेले ठळक मुद्दे :

१) काही मान्यवरांनी त्यांच्या संकल्पनेत दलित रंगभूमीला आंबेडकरी विचारांचे अधिष्ठान दिले आहे. कारण दलित रंगभूमीने आपल्या प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून स्वीकारल्या असतील तर ती विचारधारा दलित रंगभूमीवरून सादर झाली पाहिजे. याचा आग्रह धरला पाहिजे. म्हणून अशा संकल्पना दलित रंगभूमीला मान्य होणाऱ्या आहेत असे वाटते.

२) सर्व क्षेत्रात पिळलेल्यांना स्वाभिमानाने जगा असा संदेश देणारी शक्ती म्हणजे दलित रंगभूमी होय. पण अशा दलित नाटकामध्ये आंबेडकरी विचार असणे आवश्यक आहे. तरच ही संकल्पना स्पष्ट होऊ शकेल. ज्यांना आजपर्यंत कोणत्याही प्रकारचे हक्क मिळालेले नाहीत. त्यांचे शोषण झालेले आहे हे शोषण सामाजिक धार्मिक, आर्थिक पातळीवर झालेले असेल असा उपेक्षित वंचित लोकांचा आपल्या हक्कासाठी रंगभूमीवर काढलेला आवाज म्हणजे दलित रंगभूमी होय.

३) अनेक विचारवंताच्या संकल्पनेत विचारांचा समान धागा जाणवतो. दलित नाटकाने आपल्या प्रेरणा जर डॉ. आंबेडकरांपासून स्वीकारलेल्या असतील तर त्यात आंबेडकरी जाणीव दिसली पाहिजे काहींच्या संकल्पनेत आंबेडकरी जाणिवांचा अभाव दिसतो.

४) काही संकल्पनेवरून दलित नाटक आणि फुले आंबेडकरी प्रेरणेचे नाटक यात वेगळेपण आहे. दलित नाटकाहून ते भिन्न आहे. ज्या नाटकातून वास्तव जीवन, वास्तव समस्या वेदना विद्रोहाबरोबर फुले आंबेडकरांच्या जाणिवा प्रकट झाल्या आहेत अशा नाटकांना फुले आंबेडकरी प्रेरणेचे नाटक म्हणतात.

५) लेखकाने आपले लेखन श्रेष्ठ वा कनिष्ठ यांची पर्वा न करता आपल्या लिखाणातून स्वत:च्या जाणिवेचा वेध घेऊन लिहले तर त्यांचा त्या विद्रोह दिसून येईल त्यांनी स्वत:चा शोध घेऊन आंबेडकरी प्रेरणेने लिहले पाहिजे व त्या साहित्य कलाकृतीतून आपली वेदना विद्रोह प्रकट केला पाहिजे.

६) दलित रंगभूमी ही उद्याची नवसमाजाची व नवसमाज निर्माण करण्याच्या हेतूने ही रंगभूमी महत्त्वाची आहे असे वाटते.

७) काही विचारवंताच्या संकल्पनेतून असे जाणवते की, आज प्रत्यक्ष दलित जाणिवांशी समरस झालेले गुणी कलावंत जातीधर्मनिरपेक्षतेने काम करताना आढळतात दलित रंगभूमीने आजवर केलेले नाट्यप्रयोग आशयदृष्ट्या आपल्या एकूणच समाजाला उद्‌बोधक नाट्यप्रत्यय देणारे आहेत. त्यामुळे आज फक्त प्रतिभावंत नाटककारांची दलित रंगभूमीला गरज आहे. बाकी सर्व साज दलित रंगभूमीकडे आहेच.

८) वरील विचारवंताच्या संकल्पनेतून असे जाणवते की, मानव्याच्या रक्षणासाठी कल्याणासाठी वैचारिक बांधीलकी मानणारी उपेक्षितांच्या व्यथा वेदनेची ही रंगभूमी आहे. त्यांच्या अनुभवाचा अविष्कार नाटकातून होणे ही स्वाभाविक गोष्ट आहे. दलितांनी दलितांसाठी दलितांचे दलितत्व दूर व्हावे म्हणून केलेला नाट्यधर्मी अविष्कार म्हणजे दलित रंगभूमी होय या संकल्पना मान्य होण्यासारख्या आहेत. परंतु डॉ. आंबेडकरांच्या विचारांना धरून चालले पाहिजे. समग्र मानव मुक्तीच्या लढ्याच्या ध्येयासाठी ही दलित रंगभूमीची संकल्पना योग्य आहे असे वाटते.

९) दलित नाटक हे आंबेडकरी विचारांनी प्रभावित झालेले त्यांच्या जीवनविषयक आकलनाचा कलाविष्कार आहे. याबरोबर भगवान बुद्धाची अतिव करुणाही महत्त्वाची आहे. विद्रोह आणि नकार यांनी युक्त अशी दलित संवेदनेची अभिव्यक्त करणारी जीवनविषयक मूल्यांचे चित्रण करणारी रंगभूमी म्हणजे दलित रंगभूमी होय.

१०) दलित रंगभूमी ही आंबेडकरी चळवळीचा एक भाग आहे. पारंपरिक जीवनसखीला नाकारून काळसंदर्भात नवीन जीवनमूल्यांचा स्वीकार करून पारंपरिक मराठी रंगभूमीला आव्हान देणारी दलित रंगभूमी आहे. डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेने नवीन जीवन मूल्यांचाही स्विकार करून विद्रोहाने पेटून उठलेल्या दलितांची रंगभूमी होय. असे संकल्पनेतून दृष्टीस येते.

११) काहींनी दलित रंगभूमीला प्रबुद्ध रंगभूमी असे नाव दिले आहे. भरतमूनींनी तथाकथित जो मानवतेला काळीमा फासणारा प्रवाह निर्माण केला आहे. त्या प्रवाहाविरुद्ध प्रबुद्ध रंगभूमीला लढा द्यावयाचा आहे. गौतम बुद्ध आणि डॉ. आंबेडकर यांनी ज्याप्रमाणे प्रवाहाच्या विरुद्ध जाऊन क्रांती केली त्याप्रमाणे प्रबुद्ध रंगभूमीला क्रांती करावयाची आहे.

## दलित रंगभूमीच्या प्रेरणा :

दलित रंगभूमीच्या प्रेरणांचा विचार करीत असताना या रंगभूमीच्या प्रेरणास्थानी महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत हे स्पष्ट आहे. समाज प्रबोधनाच्या तीव्र इच्छेमधून दलित रंगभूमीचा उदय झाला आहे. दलित रंगभूमीचा विकास

लोकरंगभूमीवरील लोककलेतून झाला आहे हे आपले आग्रही मत भि. शि. शिंदे, प्रेमानंद गज्वी, विजयकुमार गवई, अविनाश डोळस यांनी मांडले आहे. लोकरंगभूमीवरील विशेषत: जलसा, लोकनाट्य, शाहीरीमध्ये दलित रंगभूमीची पाळेमुळे सापडतात असे मानले जाते.

दलित रंगभूमीचा जेव्हा आपण विचार करू लागतो तेव्हा सत्यशोधक जलसे व आंबेडकरी जलसे याचा मागोवा घेतल्याशिवाय आम्हाला गत्यंतरच उरत नाही. गेल्या शतकाच्या उत्तरार्धात महात्मा फुले यांनी आपल्या चिकित्सक कुशाग्र आणि उपहासगर्भ शैलीत ते जलसे लिहले व लोकांसमोर सादर करून त्याचे प्रबोधन केले. त्याला इतिहासात तोड नाही आजही त्या जलशाचे महत्त्व कमी झाले आहे असे वाटत नाही. इतके ते ज्वलंत आणि जिवंत आहेत. गोपाळबाबा वलंगकर, किसन फागूजी बनसोडे, भीमराव कर्डक, बापू मास्तर शिंदे इतर ज्ञात-अज्ञात जलसेकार शाहिरांनी लिहलेले वग, फार्स, पोवाडे, लावण्या, संवाद म्हणजे सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या या सामाजिक जाणीव बाळगणाऱ्या दलित रंगभूमीची प्रेरणाशक्तीच म्हणावे लागेल.

तमाशाची प्रेरणा आणि दलित रंगभूमीची प्रेरणा भिन्न-भिन्न स्वरूपात आहे, असे असले तरी तमाशाचे संदर्भ रूप किसन फागू बनसोडे यांनी विसाव्या शतकाच्या सुरूवातीला बसलले आहे. आपल्या तमाशाची त्यांनी प्रेरणासुद्धा बदलली आहे. 'सनातनी धर्माचा पंचरंगी तमाशा' लिहण्यापाठीमागची प्रेरणा निखळ मनोरंजनाची नव्हती तर ती समाजप्रबोधनाचीही होती. म्हणजेच विसाव्या शतकाच्या अगोदर तमाशाने लोकरंजन हे प्रयोजन जरी स्वीकारले असले तरी विसाव्या शतकाच्या पहिल्या चरणात मात्र किसन फागू बनसोडे यांनी तमाशाचे पारंपरिक स्वरूप बदलले आहे. त्यामुळे त्याची प्रेरणासुद्धा बदलली. म्हणूनच भालचंद्र फडके म्हणतात त्याप्रमाणे, ''लेखनाच्या प्रेरणा बदलल्या की लेखकाचे लेखनाचे स्वरूप बदलते.''[२१] या तत्त्वानुसार किसन फागू बनसोडे यांनी आपल्या लेखनाच्या प्रेरणा बदलल्या त्यामुळेच पारंपरिक तमाशापेक्षा नव्या आकारात नव्या विचारात तमाशा अवतरला व या तमाशाने अस्पृश्य बांधवांना आत्मभान आणून देण्याचे कार्य केले. प्रबोधनाचा पाया घातला याचे सर्व श्रेय महात्मा फुले यांना जाते. कारण किसन

फागू बनसोडे यांच्या काळात अस्पृश्य समाजाकडे सहानुभूतीने, उदारपणे पाहण्याची दृष्टी महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक जलशाच्या चळवळीने निर्माण केली होती. म्हणूनच किसन फागू बनसोडे यांच्या लेखनामागे महात्मा फुल्यांची समाजप्रबोधनाची लौकिक प्रेरणा होती.

तमाशा या लोककलेबरोबरच महात्मा फुल्यांच्या काळात जलसा निर्माण झाला. पारंपरिक तमाशाचे स्वरूप बदलून जलसा तयार झाला. जलशाने प्रारंभापासूनच समाज प्रबोधनाची प्रेरणा स्वीकारली होती. सत्यशोधक चळवळींच्या विचारांचे वाहन म्हणून जलशाकडे शाहिराकडे पाहिले जाते. सत्यशोधक जलशांनी सार्वत्रिक शिक्षण प्रसार, सावकारी पाश, अस्पृश्यता निवारण, जातीभेद नष्ट करणे, दृष्ट रूढींचे उच्चाटन, स्त्रीशिक्षण, अंधश्रद्धा यासारखे सत्यशोधकी जलशांमधील विषय हाताळले आहेत. या विषयाकडे दृष्टीक्षेप टाळल्यास सत्यशोधक जलशांनी समाजप्रबोधनाचे धोरण स्वीकारले होते. यापाठीमागे महात्मा फुले यांचीच प्रेरणा होती.

सत्यशोधक जलशाप्रमाणेच आंबेडकरी चळवळीतील विचार जनसामान्यापर्यंत पोहोचविण्यासाठी आंबेडकरी जलसे निर्माण झाले. या जलशाच्या पाठीमागेसुद्धा आंबेडकरी चळवळी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचीच प्रेरणा होती.

लोकरंगभूमीवरील तमाशा, जलसा, लोकनाट्य, शाहिरी या लोककला समाजप्रबोधनासाठी निर्माण झाल्या आहेत. या लोककलामधून जो विचार जागृत झाला. त्याच्या प्रेरणास्थानी महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत.

दलित रंगभूमीवरील नाटकांच्या प्रेरणांचा विचार करीत असताना आपणाला असे दिसून येते की, दलित रंगभूमीचा पूर्वरंग म्हणून महात्मा फुले यांच्या 'तृतीय रत्न' या नाटकाचा उल्लेख अभिमानाने केला जातो. महात्मा फुले यांचे संपूर्ण वाङ्मयच समाज प्रबोधनाच्या दृष्टीने लिहलेले आहे. त्यामुळे 'तृतीयरत्न' हे नाटक अपवाद नाही. समाजप्रबोधनाचीच दृष्टी या नाटकातून प्रतित होते म्हणून 'तृतीयरत्न' या नाटकाची प्रेरणा ही लोकरंजनापेक्षा समाजप्रबोधनाची होती. हीच प्रेरणा 'पाखंडी संवाद' लिहणारे गोपाळबाबा वलंगकर यांची होती. तसेच 'संत चोखामेळा' हे नाटक लिहणारे किसन फागू

बनसोडे यांनीही समाजप्रबोधनासाठी आपल्या अस्पृश्य समाजाला आत्मभान येण्यासाठी नाटकाची रचना केली. गोपाळबाबा वलंगकर आणि किसन बनसोडे यांच्या लेखनापाठीमागे महात्मा फुल्यांची प्रेरणा होती.

'दलित नाटक हे प्रामुख्याने आंबेडकरी विचारांनी प्रभावीत झालेल्या जीवनविषयक आकलनाचा कलाविष्कार आहे.' असे निश्चितच सांगता येते. आणि म्हणूनच या नाटकांची प्रेरणाच मूळी म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत. यांच्या विचारातून समाजप्रबोधनाचे काम सुरूवातीपासून आजपर्यंत दलित रंगभूमीच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न दलित नाटककार करीत आहेत.

## दलित रंगभूमीचा उगम :

आज ज्याला आपण दलित साहित्य म्हणत आहोत. त्याचा उगम इ.स. १९६० नंतर झाला असे म्हटले जाते. परंतु दलित साहित्याचा उगम साधारणपणे १०० वर्षे अगोदर झाला आहे हे आज अनेक पुराव्यांनी सिद्ध झालेले दिसून येते.

इ.स. १८५५ साली लिहले गेलेल्या महात्मा फुले यांच्या 'तृतीय रत्न' या नाटकावरून दलित रंगभूमीचा उगम शंभर वर्षे अगोदर झाला आहे असे दिसून येते. त्याचप्रमाणे त्याच काळात मुक्ताबाई या मातंग समाजाच्या मुलीने इ.स. १८५६ साली ज्ञानोदयात "मांगा-महारांच्या दु:खाविषयी" अशा नावाचा निबंध लिहला आहे. मुक्ताबाई नंतर अस्पृश्य समाजाची अवस्था, व्यथा, वेदना, अन्याय, अत्याचार, दु:ख गोपाळबाबा वलंगकर, शि. जा. कांबळे, किसन फागू बनसोडे इत्यादींनी समाजासमोर मांडले. स्वातंत्र्याच्या आसपास आण्णाभाऊंनी (साठे) इत्यादींनी साहित्यनिर्मिती केली होती. यावरूनच दलित साहित्याचा उगम १९६० पूर्वी जवळ-जवळ शंभर वर्षे पाठीमागे नेता येतो. हे आज अनेक संशोधकांनी पुराव्यांनी सिद्ध केले आहे.

दलित साहित्याप्रमाणेच दलित रंगभूमीचा उगम १९७० ते १९८० या दशकात झाला असे म्हटले जाते. या मताबाबत मर्यादा जाणवते कारण दलित रंगभूमीची मुळे आपणाला लोकरंगभूमीकडे सापडतात. लोकरंगभूमीवरील लोककला खऱ्या अर्थाने

दलितांनीच जनत केल्या. त्याचा विकासही दलितांनीच केला असे दिसून येते. तमाशाने सुरूवातीच्या काळात करमणुकीचे, रंजनाचे प्रयोजन स्वीकारले असल्यामुळे प्रस्थापित लोक या कलेला आणि कलेच्या कलावंत प्रेक्षकांना हिणकस अभिरूचीचे लोक म्हणून उपहास करू लागले. तमाशा ओंगळे आचरट असतो अशी टीका होऊ लागली. पुढे काही दिवस तमाशावर बंदी घालण्यात आली. तमाशांमधून एक नवा प्रकार निर्माण झाला तो म्हणजे जलसा. तमाशामधून जलसा उत्कांत झाला खरा पण जलशाने लोकरंजनाचे प्रयोजन स्वीकारले नाही. जलसा हा समाजप्रबोधनासाठी निर्माण झाला.

महात्मा फुल्यांच्या काळात सत्यशोधक चळवळीची विचारधारा समाजात रुजविण्यासाठी जलशांचा उपयोग केला गेला. पुढे आंबेडकर चळवळीची विचारधारा समाजात रुजविण्यासाठी जलशाचा उपयोग झाला. तमाशाचा आणि जलशाचा उपयोग करताना एक गोष्ट जाणवते ती अशी की, दत्ता भगत म्हणतात त्याप्रमाणे,

''सुरुवातीच्या काळात तमाशाची प्रेरणा ही अध्यात्माची होती तीच त्याची परंपरा होती. पंरतु किसन फागू बनसोडे यांनी ती परंपरा मोडीत काढली. जलशाची परंपरा मात्र लौकीक होती. ती कधीच अलौकीक नव्हती. त्यामुळे जलसा हा तमाशामधून जरी उत्क्रांत झाला असला तरी त्याने तमाशातील अलौकीक परंपरेतील गण, गौळण यात बदल केला. तमाशातील मनोरंजनाचे सर्वात आकर्षक पात्र म्हणजे 'नाच्या' किंवा 'नाची' होय. या जलसेकारांनी हे पात्र आपल्या उपहास गर्भ व उपरोक्त शैलीत सामाजिक व्यंगावर विनोदी टीका टिप्पणी करणारे तमाशातील सोंगाड्या हे पात्र कायम ठेवले आहे. सत्यशोधक जलशात हा सोंगाड्या विदुषक म्हणून वावरताना आढळतो. कथानकात परखडपणे विनोदी टिका टिप्पणी करणारा तो सुधारक आहे. तर आंबेडकरी जलशात तो कट्टर सुधारकही असतो आणि कधीकधी तो तमाशातील मावशी सारखाही अवतरतो. आंबेडकर जलशात तो प्रबोधनवादी सुधारकाबरोबरच आपल्या हजरबाबी, मिस्कील आणि आपल्या वाचाळ परंतू मार्मिक संवादांनी सामाजिक व राजकीय व्यंगावर नेमकी बोट ठेवणारी मावशीही सादर करताना दिसतो. ही मावशी दुहेरी पद्धतीने वावरताना आढळते. कधी अज्ञान पांघरून दलित-पद्दलित आणि स्त्रीजातीची दु:खे, व्यथा आणि समस्यांचे लज्जास्पद स्वरूप

विनोदी पद्धतीने विशद करते तर कधी अन्याय, अत्याचारविरुद्ध, आवेशपूर्ण बंडाची भाषा वापरते.''[२२] अशाप्रकारे सत्यशोधक जलशाची परंपरा आपणाला दिसून येते.

पुढे आंबेडकरी जलशात गण गौळणींच्या ऐवजी सुरूवातीचा गण लौकिक बनविला म्हणजेच जलशाने लौकिक परंपरा स्वीकारली. दलित रंगभूमीने याच परंपरेचा कित्ता पुढे गिरविला आहे. त्यामुळे दलित रंगभूमीचा उगम आणि विकास स्पष्ट करताना तमाशा-जलसा असा क्रम सांगता येतो. त्याचप्रमाणे जलशातील शाहिरी ही सुद्धा समाजप्रबोधनकारी होती आणि त्यामुळे तमाशा जलसा आणि शाहिरी अशी परंपरा दलित रंगभूमीला लाभली आहे.

आंबेडकरी जलसे म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या दलित दास्यमुक्तीच्या धर्मयुद्धाचे वाङ्मयीन दस्तऐवज होत. त्यामुळेच आंबेडकरी विचार जनमानसात रुजविण्यासाठी डॉ. आंबेडकरांच्या काळात पायाला चक्रे लावून भटकंती करणाऱ्या दलित शाहिरांच्या, जलसेकारांच्या, लोककवींच्या खांद्यावर आजचे दलित नाटक उभे आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

अशाप्रकारे दलित रंगभूमीचा उगम पाहत असताना आपणाला तमाशा-जलसे-शाहिरी आणि दलित नाटक (रंगभूमी) असा क्रम लावता येतो.

## दलित रंगभूमीची वाटचाल :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर 'आंबेडकरी चळवळ' काहीशा प्रमाणात थंडावली. त्यामुळे आंबेडकरी जलशांची निर्मिती आणि प्रयोगही कमी प्रमाणात सादर होऊ लागले. जलशांचा प्रभाव मात्र समाजांवर टिकून होता. जलशामधूनच पुढे दलित नाटक उत्क्रांत झाले. असे असले तरीसुद्धा १९७० ते १९८० च्या अगोदरही दलित नाटक अस्तित्वात होते पण ते फारच जुजबी स्वरूपात होते. जलशातून निर्माण झालेले नाटक फुले-शाहू-आंबेडकरी प्रेरणेचे होते. त्यामुळेच दलित रंगभूमीचा क्रम तमाशा-जलसा-शाहिरी-दलित नाटक असा निश्चित करावा लागतो.

दलित रंगभूमीच्या वाटचालीत लोकरंगभूमीवरील तमाशा-जलसा-शाहिरी या लोककलांनी फारच मोठे योगदान दिले आहे. असे सिद्ध झाले आहे. याबाबत प्रेमानंद गज्वी, भि. शि. शिंदे, दत्ता भगत यांचा अपवाद सोडल्यास सर्वांनीच दलित रंगभूमीच्या जडणघडणीत तमाशाचे योगदान महत्त्वाचे मानले आहे.

"तमाशा, गोंधळ, भारूड, जलसा, जागरण, दठार या लोककला दलित नाटकाची जननी आहे."[२३] असे प्रेमानंद गज्वी यांना वाटते.

भि.स. शिंदे हाच क्रम सांगताना म्हणतात की, "जलसा, वग, फार्स, पोवाडे, लावण्या, संवाद यामधून दलित रंगभूमी उत्क्रांत झाली आहे."[२४] तमाशाच्या परंपरेचा आणि प्रेरणेचा विचार करताना दत्ता भगत त्यावर आक्षेप घेतात.

"तमाशाची प्रेरणा मुलतः अध्यात्माची होती. पेशवाईत त्यात रंजनाचा पदर मिसळलेला होता."[२५] दलित रंगभूमीची प्रेरणा ही समाजप्रबोधनाची आहे. त्याचबरोबर दलित रंगभूमी लौकीक परंपरा मानणारी आहे. तमाशाच्या आरंभाच्या प्रेरणा आणि परंपरा दलित रंगभूमीहून वेगळ्या आहेत. त्यामुळे ते दलित विकासात तमाशाला महत्त्व देत नाहीत. परंतु विसाव्या शतकात किसन फागू बनसोडे यांनी तमाशाची पूर्वीची परंपरा, प्रेरणा पूर्णपणे बदललेली आहे. त्यांनी नवा तमाशा उभा केला आहे. त्यामुळे तमाशाला दलित रंगभूमीच्या विकासात महत्त्व देणे गरजेचे आहे. त्यांनी 'संत चोखामेळा' हे नाटक (१९२४) साली लिहले. त्यानंतर त्यांनी अनेक तमाशे लिहले त्यांचा 'सनातन धर्माचा पंचरंगी तमाशा' (१९३२) हा चांगलाच प्रसिद्ध होता. शिक्षण समाज सुधारणा, धर्मसुधारणा हे मुख्य उद्दिष्ट ठेवून बनसोडे यांनी उपहास विनोद व विडंबनाच्या पद्धतीने असे तमाशे वगनाट्ये व प्रहसने लिहली. त्यातून जागृतीचे कार्य घडले. किसन फागुजी नंतरचा काही काळ रिकामाच आढळतो.

दलित विषय घेऊन काही दलितेतर लेखकांनी नाटके लिहण्याचा उल्लेख सापडतो. प्रबोधनकार के. सि. ठाकरे 'खरा ब्राह्मण' (१९३३) हे नाटक तसेच श्री. ग. व. गोखले 'महारवाडा' (१९३६) हे नाटक पण त्यात किसन बनसोडे यांच्या नाटकाप्रमाणे पोटतिडीख

आढळत नाही. १९४० नंतर 'अस्पृश्य सत्यार्थ प्रकाशक जलसा' स्थापन करून केरुबुवा गायकवाड यांनी दलित जागृतीसाठी अनेक कार्यक्रम घडवून आणले. 'शाळेचा प्लॉट', 'बायकोचा नवरा', 'चिमणचा वग' अशी अनेक वगनाट्ये केरुबुवा गायकवाड यांनी लिहली.

स्वांतत्र्य प्राप्तीनंतर एकूण दलित साहित्यालाच ललिताकार प्राप्त झाला. नाट्यक्षेत्रातील उमेदीची पावले उमटू लागली. सुरूवातीस दलित नाटकाची एकांगी प्राथमिक अवस्था दिसते. पण हळूहळू याही अविष्काराचे क्षेत्र काही प्रमाणात भरत गेले. दलित नाट्य व रंगभूमीला पारंपरिक रंगभूमीपेक्षा एक निराळे स्वरूप प्राप्त होत गेले. मोरेश्वर तांबे 'प्रेमप्रताप' (१९४७), डॉ. प्रभाकर गणवीर 'नोकरीच्या जाळ्यात' (१९५४) हे स्वतंत्र सामाजिक नाटक लिहले. प्रा. म. भि. चिटवीस यांचे 'युगयात्रा' (१९५५) हे नाटक यावेळी बरेच प्रभाव सोडून गेले. या नाटकाने दलित रंगभूमीला नवे परिमान प्राप्त करून दिले. येथूनच खऱ्या अर्थाने दलित नाटकाला सुरूवात झाली. या नाटकाचा पहिला प्रयोग डॉ. आंबेडकरांच्या समक्ष त्यांच्या वाढदिवशी सादर केला आणि दुसरा प्रयोग १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे दीक्षाभूमीवर सहा लाख रसिकांसमोर सादर केला. 'युगयात्रा' या नाटकामध्ये अनेक वेगवेगळी ऐतिहासिक प्रसंगाची दृश्ये परिणामकारपणे चित्रित केली आहेत. चिटणीस यांचे 'युगयात्रा' हे नाटक म्हणजे आजच्या दलित नाट्याचे डोळस जाणीवपूर्वक केलेली नांदीच होय. इ.स. १८५५ नंतरच्या काळात गंगाधर पानतावणे यांचे 'माणुसकीचे बंड' (१९५७). नामदेव व्हटकर 'वाट चुकली' (१९५५) मा. आ. कारंडे गुरुजी 'नवी वाट' (१९५६) आण्णा भाऊ साठे 'इनामदार' (१९५८) कारंडे गुरूजींचे 'संगीत जयबौद्ध' (१९६०) अशी नाटके उदयास आलेली दिसतात. या नाटकातून दलितांवर होणाऱ्या अन्यायाला दु:खाला वाचा फोडणे तिच्याविरुद्ध आवाज उठविणे, माणूसकीच्या हक्काची मागणी सामाजिक जागृती, लढ्याचे संदेश देणे, बौद्ध धर्माचे प्रसार हे कार्य घडले असल्याचे दिसते. त्याचप्रमाणे अशोक अहिरे 'समतेचा विजय', खुशाल कांबळे 'ग्रामराक्षस' बाबुराव गायकवाड 'नातं', श्रीकांत लाल

'गणपतीची कमाल व उंदराची धझाल' हे विनोदी नाटक इ. नाट्यलेखन दलित नाटकाची आवश्यकता प्रतिपादन करीत होतेच.

'दलित रंगभूमी' सिद्धविण्याच्या दृष्टीने एकेकटे प्रयत्न काहिसे अपुरे पडलेले जाणवतात. साधारणपणे १९७० पासून दलित नाट्याचे स्वरूप पालटू लागल्याचे जाणवते. असा प्रयत्न करण्यात प्रा. गंगाधर पानतावणे, प्रा. दत्ता भगत यांची नावे सांगता येतील. दलित नाट्यनिर्मितीच्या दृष्टीने औरंगाबादच्या नागसेन वनात १९७० पासून जे प्रयत्न झालेत ते विशेष जोरकस वाटतात. मोठ्याप्रमाणात झालेला हा पहिलाच प्रयत्न होय. विद्यार्थ्यांमधून नाट्यलेखन व्हावे या दृष्टीने जे प्रयत्न झालेत त्यात अविनाश डोळस, अशोक अहिरे, खुशाल कांबळे, धनंजय गुडघे, मधुकर वाकोडे, बाबुराव गायकवाड यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. पुढे आलेली 'आहुती' (१९७०) यामध्ये दलित समाजावर होणाऱ्या अन्यायाचे बोलके चित्र उभे केले आहे. याशिवाय नवनाट्य लेखनात नाट्यलेखन निर्माण झालेले दिसून येते. यानंतर दलित नाटकाची वाटचाल वेगात झाली. भि. शि. शिंदे, 'संगीत भिक्षुणी वासदत्ता' (१९७५) कमलाकर डहाक 'नरबळी' (१९७४) हेमंत खोब्रागडे 'सुर्यास्त' (१९७७) भि. शि. शिंदे 'काळोखाच्या गर्भात' इ. अनेक नाटके उदयास आली. प्रेमानंद गौरकर 'बुद्धमं सरणं गच्छामि' (१९८०) प्रेमानंद गज्वी 'देवनवरी' (१९८०), प्रकाश त्रिभुवन 'थांबा रामराज्य येतय' (१९८०), रामनाथ चव्हाण 'आधारस्तंभ' (१९८१), रुस्तुम अचलखांब 'कैफियत' (१९८१), एकनाथ चव्हाण 'साक्षीपूरम' (१९८२), प्रेमानंद गज्वी 'तनमाजोरी' (१९८३), वाझ माती (१९८२), टेक्सास गायकवाड 'आम्ही देशाचे मारेकरी' (१९८२), 'जळवा' (१९८४), शिल्पा मुब्रीसकर 'झाडाझडती' (१९८४), प्रेमानंद गौरकर 'मशाल' (१९८६), टेक्सास गायकवाड 'मन्वतर' (१९८६), दत्ता भगत 'खेळिया' (१९८६), 'वाटा-पळवाटा' (१९८७), तुषार भद्रे 'कारान' (१९८७), एस. जी. वाघ 'भूमिहीन' (१९८८), रामनाथ चव्हाण 'बामणवाडा' (१९९१), प्रेमानंद गज्वी 'किरवंत' (१९९१), 'गांधी-आंबेडकर' (१९९८), भालचंद्र फडके 'डॉ. आंबेडकर आणि गांधीजी' (१९८८) इ. नाटकांची निर्मिती झाली. नव्या लेखकांनी मराठी रंगभूमीचा जुना तोंडवळाच बदलून टाकला. दलित

नाटक हे 'दलित' जीवनाचेच नाट्य असल्याने ते प्रस्थापित रंगभूमीला जवळचे राहणार नाही हे उघड आहे. दलित नाटककारांनी आपले नाटकाचे विषयच दलित जीवनानुभवावर आधारित मांडले आहेत. त्यामुळे त्यात दलित जो जीवन जगतोय तेच मांडण्यात आले आहे. या नाटकाच्या विषयामध्ये अस्पृश्यता निवारण्यासाठी रोटी-बेटी व्यवहारास प्रोत्साहन देणारी नाटके, दलितांच्या मुक्तीसंग्रामावर आधारीत नाटक, दलितांच्या बौद्ध धर्माबद्दलची प्रतिक्रिया असणारी नाटके दलितावरील अन्यायाचे चित्र असणारी नाटके, दलित मुक्तीची कहाणी, बौद्ध धर्माचे वैशिष्ट्य सांगणारे नाटक. दलित कलावंताच्या व्यथा आणि वेदना प्रकट करणारी नाट्यकृती, मानवनिर्मित विषमतेवर आधारीत नाट्यकृती, दलित स्त्रीच्या दुहेरी गुलामगिरीचे चित्रण, दलित चळवळीचा दलित समाजावर झालेला परिणाम. नामांतरासाठी झालेल्या संघर्षावर आधारीत नाटके, आंतरजातीय विवाह विषयक नाटके, दलित चळवळीतील राजकारणावर प्रकाश टाकणारी नाटके, दलित चळवळ आणि राजकारणातील तीन पिढ्यांचा संघर्ष, गांधी आणि आंबेडकर यांच्यातील संघर्ष मांडणारी नाटके अशाप्रकारचे विषय हे दलित नाटकातून आलेले आहेत. आणि दलित नाटकाची वाटचाल विकसित करण्याचे प्रयत्न केलेले दिसतात.

## दलित रंगभूमीची वैशिष्ट्ये :

दलित नाटक हे वास्तवदर्शी आणि समस्याप्रधान आहे, त्यामुळे त्यातून प्रबोधनाचे कार्य केले जाते. मात्र प्रस्तापित मराठी रंगभूमीने लोकरंजन, करमणूक हेच एक प्रयोजन मोठ्या प्रमाणात मानले आहे. असे असले तरी प्रस्तापित मराठी रंगभूमीवरून काही समस्याप्रधान नाटके सादर होताना दिसतात. परंतु त्याची संख्या अत्यल्प आहे. दलित रंगभूमी सामाजिक बांधिलकी मानणारी रंगभूमी आहे. त्यामुळे तिचे उद्दिष्ट समाजप्रबोधनाचे आहे. दलित समाजातील वास्तव समस्याच दलित रंगभूमीवरून व्यक्त झालेल्या आहेत. दलितांचे आत्मभान जागृत व्हावे. फुले-आंबेडकरी विचाराच्या जाणिवा समाजात रूजाव्यात या ध्येयाने दलित नाटकाची निर्मिती होत आहे. या नाटकातून सामाजिक समस्यांना अधोरेखित केले जात आहे. इबसेनने मध्यमवर्गीय जीवन व त्यांच्या समस्या नाटकातून मांडल्या. चार भिंतीतील कौटुंबिक संघर्ष रंगविणाऱ्या इब्सेनने

रंगभूमीवर वास्तववादी नाटक आणले. दलित रंगभूमीने हाच आदर्श जपत मराठीमध्ये पहिल्यांदा वास्तववादी दृष्टीने नाटकाची निर्मिती केली. जॉर्ज बर्नाल्ड शॉने देखील आपल्या नाटकातून सामाजिक अन्याय, बुद्धिमंताचे भ्रम बौद्धिक दास्य, पारंपरिकता यावर हल्ले चढविले. नाटक रंजनाचे साधन नव्हे, ते एक वैचारिकतेचे माध्यम आहे. असे शॉला वाटत होते. दलित रंगभूमीने नाटकास वैचारिकतेचे माध्यम मानले आहे. चळवळीची विचारधारा साहित्यात प्रतिबिंबित होत असते. आंबेडकरी चळवळ दलित नाटकातून प्रतिबिंबित झालेली दिसते. या दृष्टीने बेख्तशी दलित रंगभूमीचे नाते प्रस्थापित होते. बेख्तने मार्क्सचे तत्त्वज्ञान नाटकातून मांडले. त्याने जीवनातील समस्या वस्तुनिष्ठ दृष्टीने विचारात घेऊन नाटकाची निर्मिती केली. दलित नाटकातून समाजाचे चित्रण करताना प्राचीन काळापासून दलितांच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराचे दर्शन दलित नाटकातून होते. पण अन्याय, अत्याचार करणाऱ्या प्रवृत्तीच दलित नाटकात पाहावयास मिळतात.

दलित रंगभूमी महात्मा फुल्यांच्या 'तृतीय रत्न' या नाटकाशी आपले नाते प्रस्तापित करीत आहे. या नाटकात पुरोहित सामान्य जनांचे शोषण करीत आहे ही समस्या 'तृतीयरत्न' यामध्ये प्रखरपणे मांडलेली आहे. सत्यशोधकी जलसे, आंबेडकरी जलसे यामधून समस्या प्रकट झाल्या आहेत. म. भि. चिटणीस यांच्या 'युगयात्रा' या नाटकात पुराणकाळापासून वर्तमान काळापर्यंत अस्पृश्यांच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराचे दर्शन घडते. देशाला स्वातंत्र्य मिळून अस्पृश्यांना घटनेने स्वातंत्र्य, समता, बंधुता हे हक्क दिले आहेत. पण वास्तवात दलितांना आजही अन्यायकारक वागणूक मिळते. त्यांच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक समस्या संपलेल्या नाहीत. आजही दलितांना काही ठिकाणी मंदीर प्रवेश नाकारला जातो. पाणवठ्यावर प्रवेश नाकारला जातो. अस्पृश्य स्त्रियांवर अन्याय अत्याचार होतात. तर देवाच्या, धर्माच्या नावावर पोतराज, वाघ्यामुरळी, देवदासी अशा अनिष्ट प्रथेला येथील स्त्री पुरूषांना बळी जावे लागते आहे. यासारख्या अनेक समस्या दलित समाजासमोर उभ्या आहेत. याचेच वस्तुनिष्ठ चित्रण दलित नाटकातून दिसते. या सर्व समाजातील जिवंत जीवनानुभव दलित नाटककारांनी प्रत्यक्ष भोगलेला आहे. त्यामुळेच ते वास्तववादी नाटक ठरते.

दलित साहित्यातील, कविता, कथा, कादंबरी, आत्मकथन याप्रमाणेच दलित रंगभूमीने एकांकिका, नाटकांमधून प्रस्थापित समाजव्यवस्थेविरुद्ध नकार, विद्रोह, प्रकट केलेला आहे हे रंगभूमीचे प्रमुख वैशिष्ट्य मानले जाते. दलित नाटक, एकांकिकेमधून प्रकटणारा विद्रोह स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायासाठी आहे. याची जाणीव दलित नाटककारांना आहे. समग्र मानव मुक्तीचा ध्यास दलित रंगभूमीने घेतलेला आहे. उदा.- 'काळोखाच्या गर्भात' या भि. शि. शिंदे यांच्या नाटकात सिद्राम सकट विद्रोही आहे. सवर्ण अस्पृश्यांवर अन्याय, अत्याचार करतात. त्याविरुद्ध पेटून उठतो आणि वडिलांचा खून करणाऱ्यांना त्याच्याच भाषेत उत्तर देतो. त्यावरूनच असे दिसून येते की, हजारो वर्षापासून अन्याय, अत्याचाराने सिद्राम पेटून उठतो आणि त्याच्या ठिकाणी विद्रोहाची जाणीव निर्माण होते.

प्रेमानंद गज्वींच्या 'तनमाजोरी' या नाटकातून वेठबिगारांची समस्या मांडलेली आहे. या नाटकात या प्रथेला नकार दिलेला आहे.

दत्ता भगत यांच्या 'वाटा-पळवाटा' या नाटकात अर्जुन विद्रोही आहे. पण त्याचा विद्रोह माणसांना समता प्राप्त करून देणारा आहे. त्याला आंबेडकरी विचारधारेतील मूल्यात्मकतेची जाण आहे. म्हणूनच त्यांनी दंगलीत सापडलेल्या सोनलला सुखरूप तिच्या घरी पोहोच केले आहे.

दलित नाटकातून प्रकट झालेला विद्रोह नकार हा समाजात मूल्यात्मक जाणीव निर्माण करण्यासाठी प्रकट झालेला आहे. दृष्ट प्रथा, रूढींचा त्याग करून माणूसकी निर्माण करण्याचे ध्येय आंबेडकरी चळवळीचे आहे. हेच ध्येय दलित रंगभूमीचे आहे.

दलित रंगभूमीवरील नाटकातील संघर्ष हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते. कोणत्याही दलित नाटकाचा विचार केला असता त्यात संघर्ष हा येतोच.

उदा. - व्यक्ती-व्यक्तीमधील संघर्ष, व्यक्तीच्या गुंतागुंतीच्या मनातील संघर्ष तर काहीवेळा दोन किंवा अधिक विचारसरणीवरील साम्यभेदावर आधारित वैचारिक संघर्ष प्रकट होतो.

दलित नाटक समस्याप्रधान असल्यामुळे यात अनेक विध स्वरूपाचा संघर्ष प्रकट झालेला पाहण्यास मिळतो. दलित नाटके समाजप्रबोधनाच्या हेतूने निर्माण झाली आहेत. त्यांना आपल्या समाजात आत्मभार प्राप्त करून द्यायचे आहे. त्यामुळे दलित नाटकातील संघर्ष हा वेगवेगळ्या पातळ्यांवर प्रकट होतो. तो कधी आपल्या समाजा-समाजांतर्गत असतो तर कधी अस्पृश्य समाजावर अन्याय, अत्याचार करणाऱ्या समाजाविरुद्ध संघर्ष केला जातो. तर हाच संघर्ष कधी वैचारिक स्वरूपाचा असतो. अस्पृश्य नाटकातून आपल्या समाजाला न्याय, हक्क मिळवून देण्यासाठी चाललो संघर्ष अनेक नाटकांतून प्रत्ययाला येतो. या सर्व संघर्षाच्या पाठीमागे फुले-आंबेडकरांच्या विचारांच्या जाणिवा आहेत. या जाणिवामुळेच दलित समाजाला आत्मभान प्राप्त झाले आहे.

दलित नाटकातील संघर्ष हा केवळ प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध आहे असे नाही तर नवी पिढी आणि जुनी पिढी यांच्यामधील वैचारिक तात्त्विक संघर्ष दलित नाटकात पहावयास मिळतो. आंबेडकरी चळवळीमध्ये प्रत्यक्ष कार्य केलेली जूनी मंडळीही तत्त्वनिष्ठ विचारांची आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात जन्मलेली दलितांमधील दुसरी आणि तिसरी पिढी ही तत्त्वहीन आहे. असे चित्र काही नाटकांमधून रंगविले आहे. तत्त्वनिष्ठेचा अभाव असल्यामूळे ही पिढी प्रलोभनांना बळी पडते आहे. त्यामूळे चळवळीची वाताहात होते. व्यक्तीपेक्षा चळवळ श्रेष्ठ असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना व्यक्तिपूजा मान्य नव्हती. व्यक्तीपेक्षा विचार श्रेष्ठ असतो. लक्ष्मण माने यांच्या 'प्रकाशपुत्र' या नाटकात वरील विचारांचा प्रयत्य येतो.

दलित नाटकांमधून शोकांतिका मोठ्या प्रमाणात आलेल्या आहेत. दलित नाटकातून दलितांचे दु:ख, व्यथा, वेदना मांडलेल्या आहेत. दलित नाटकातील शोकांतिका ह्या जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता यामुळे या व्यक्तींना आणि समाजाला दु:ख प्राप्त झालेले असते.

दलित रंगभूमीचा प्रेक्षक ठरविताना तो सर्व स्तरावरील, वर्गातील दलित, सवर्ण असावा कारण दलित रंगभूमीला समाजप्रबोधन करायचे आहे. फुले-आंबेडकरी विचार दलित रंगभूमीवरुन मांडायचा आहे. त्यामुळे दलित आणि सवर्ण या दोघांचेही प्रबोधन

होईल या दृष्टीने दलित नाटककारांनी आपला प्रेक्षक हा सवर्ण आणि दलित निवडून त्याचे प्रबोधन करण्याच्या दृष्टीकोनातून नाटकाची निर्मिती केली पाहिजे.

कारण क्रांतीची संघर्षाची बीजे रूजवण्याची माती हीच आहे. दलित समाजाच्या मनाची मशागत प्रथम करायला हवी. त्याच्या मनातील अडाणी समजूती, लहानमोठी भये इ. चे तण बाजूला करायला हवे तरच विद्रोह रुजेल व समाजपरिवर्तनाच्या प्रकियेला गती येईल.

प्रस्तापित समाज व्यवस्थेची चीड म्हणजेच विद्रोहाची प्रवृत्ती हे दलित नाट्यवाङ्मयाचे खास वैशिष्ट्य आहे.

**निष्कर्ष :**

१) विसाव्या शतकात दलित रंगभूमीचा उदय झाला असला तरी रंगभूमीने आपले नाते शंभर वर्षापूर्वीच्या महात्मा फुले यांच्या 'तृतीय रत्न' या नाटकाबरोबर जोडले गेले आहे. त्याचबरोबर सत्यशोधक जलसे यांच्याशीही आहे. मात्र खऱ्या अर्थाने दलित रंगभूमीचा विकास हा १९७० ते १९८० या दशकात झाला.

२) दलित साहित्याच्या प्रेरणास्थानी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब हेच आहेच. त्याचप्रमाणे दलित नाटकांच्या प्रेरणास्थानीही तेच आहेत. दलित नाटक समस्याप्रधान आहे. भारतीय समाज व्यवस्थेत वास्तवतेमध्ये अस्पृश्यांना ज्या समस्यांना सामोरे जावे लागते त्याच समस्या दलित नाटकातून सादर होत आहेत.

३) दलित नाटकाचे वैशिष्ट्य म्हणजे या नाटकातून वेदना, विद्रोह, समस्या, संघर्ष, अन्याय प्रकट केले जातात. दलित नाटकातील संघर्ष हा मूल्यात्मक आहे.

४) दलित रंगभूमी ही समग्र दलित मुक्ती व दलितोन्नती या महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचा एक सांस्कृतिक भाग आहे. दीन-दलितांचे दैन्य, अज्ञान दूर करून त्यांच्यात नवचैतन्य, नवा जोम, नवा विश्वास, नवी आस्मिता निर्माण करण्यासाठी स्वाभिमान जागृत करण्यासाठी दलित रंगभूमी हे एक केंद्र आहे.

५) दलित जीवनात एक नित्य संघर्ष आहे त्या संघर्षाचे त्याला सोसाव्या लागणाऱ्या मानसिक ताणांचे दर्शन दलित रंगभूमीवरून घडते.

६) दलित नाटक हे केवळ आंबेडकरी विचारांच्या प्रचारासाठीच जन्मले नसून त्या विचारांच्या साक्षात्कारासाठी जन्मले आहे. दलित नाटक हे वैचारिक बांधिलकी मानणारे व अखिल मानव कल्याणासाठी सिद्ध झालेले व ह्या जगात जे सर्वोत्तम असे मूल्य 'मनुष्य' त्याच्या रक्षणासाठी सिद्ध झालेले आहे. मानवी मन निर्भय करणारे, रोखठोकपणाची भाषा बोलणारे, प्रस्थापिताविरुद्ध उघडपणे संघर्ष करणारे हे दलित नाटक मनोरंजनापेक्षा, प्रबोधनाचीच कास धरते, हे लक्षात येते.

**संदर्भ सूची :**


| | | |
|---|---|---|
| १) | भि. शि. शिंदे : | 'अध्यक्षीय भाषण', पहिले अखिल भारतीय दलित नाट्य संमेलन, पुणे, जाने-१९८४. (अ.भा.द.ना.संमेलन भाषणे, संपा.- त्र्यंबक महाजन) |
| २) | तत्रैव : | --,,-- |
| ३) | प्रा. विजयकुमार गवई : | अध्यक्षीय भाषण, सातवे अखिल भारतीय दलित नाट्यसंमेलन, धुळे, मे-१९९३. (दलित रंगभूमी व नाट्यचळवळ - डॉ. मधूकर मोकाशी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०००) |
| ४) | प्रा. दत्ता भगत : | अध्यक्षीय भाषण, तिसरे अखिल भारतीय नाट्यसंमेलन, आंबेजोगाई, १९८६. (अ.भा.द.ना.संमेलन भाषणे, संपा.- त्र्यंबक महाजन) |
| ५) | प्रा. अविनाश डोळस : | अध्यक्षीय भाषण, ५ वे अखिल भारतीय दलित नाट्यसंमेलन, नांदेड, १९९०. (अ.भा.द.ना.संमेलन भाषणे, संपा.- त्र्यंबक महाजन) |
| ६) | प्रा. डॉ. तारा भवाळकर : | प्रश्नावली |
| ७) | प्रा. डॉ. गंगाधर पानतावणे : | अस्मितादर्श अंक, १९७८ |
| ८) | प्रा. गौतमीपुत्र कांबळे : | प्रश्नावली |
| ९) | भालचंद्र फडके : | दलित रंगभूमी (सुरेश एजन्सी), पुणे, प्र. आ. १९९२, पृ. ४. |
| १०) | मधुसुदन गायकवाड : | अध्यक्षीय भाषण, दुसरे अखिल भारतीय दलित नाट्यसंमेलन, अहमदनगर, १९८५. |
| ११) | नरहर कुरुंदकर : | 'रंगविमर्श' - नरहर कुरुंदकर आवर्त प्रस्तावना, पृ. ११, १२, संपा. - शंकर सारडा. |
| १२) | रा.ग. जाधव : | तृतीया - पृ. ६९ (रा. ग. जाधव) साहित्य प्रसार केंद्र, नागपूर. |

| | | |
|---|---|---|
| १३) | प्रेमानंद गज्वी : | अध्यक्षीय भाषण ४ थे अ. भा. द. नाट्यसंमेलन, नागपूर, १९८८. |
| १४) | डॉ. मधुकर मोकाशी: | दलित रंगभूमी आणि नाट्यचळवळ स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २६ जानेवारी २०००, पृ. ६१. |
| १५) | डॉ. मधुकर मोकाशी: | 'दलित रंगभूमी आणि नाट्यचळवळ' स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २६ जानेवारी २०००, पृ. ७४. |
| १६) | भगवान ठाकूर : | 'साप्ताहिक आमचे मत' धुळे. लेख- दलित रंगभूमी अपेक्षा आणि मूल्यांकन, दि. १७ जाने ते २२/५/९३, संपा. - मिलिंद वामनराव पवार. |
| १७) | तत्रैव : | पृ. ८५. |
| १८) | रामदास कांबळे : | 'अस्मितादर्श' दिवाळी अंक १९८५, लेख - दलित नाटक- दलित रंगभूमी, पृ. ८५. |
| १९) | डॉ. कृष्णा किरवले : | 'अस्मितादर्श' (जा.फे.मा.) १९८४, पृ. ४२-४३. |
| २०) | डॉ. मधुकर मोकाशी : | दलित रंगभूमी आणि नाट्यचळवळ, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २६ जाने. २०००, पृ. ७२-७३. |
| २१) | संपा. भालचंद्र फडके : | दलित रंगभूमी, सुरेश एजन्सी, पुणे. प्र.आ. १९८२ (प्रस्तावना) |
| २२) | डॉ. मधुकर मोकाशी : | दलित रंगभूमी आणि नाट्य चळवळ पुणे, प्र.आ. २०००, पृ. ७. |
| २३) | प्रेमानंद गज्वी : | अध्यक्षीय भाषण, चौथे अ.भा.द. नाट्य संमेलन, नागपूर, १९८८. |
| २४) | मि. शि. शिंदे : | अध्यक्षीय भाषण, १ ले अखिल भारतीय दलित नाट्यसंमेलन, पुणे, १९८४. |
| २५) | दत्ता भगत : | अध्यक्षीय भाषण, ३ रे अखिल भा. द. ना. संमेलन, आंबेजोगाई, १९८६. |